सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले ▲ अंक : ३० ▲ शनिवार, दि. २५ ऑक्टोबर २०२५ ▲ पाने : ४ ▲ अमळनेर ▲ किंमत : १ रु. Email - globalmahatej@gmail.com

## दिनविशेष

२५ ऑक्टोबर

- स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या निवडणुका सुरू झाल्या.

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

**स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!**

# नाती, सुगंध अन् साधेपणाचा गोडवा हरवला...!

## ग्रामीण भागातील दिवाळी आता फक्त आठवणीतच...!!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

रजनीकांत पाटील

" दिवाईले ये जो रे भावड्या, ये व मनी ताई..." हा आवाज एकेकाळी गावागावात घुमत होता. शेणाने सारलेल्या अंगणात रांगोळ्यांच्या रंगांनी फुललेली सकाळ, मातीच्या दिव्यांच्या मंद उजेडात उजळलेली रात्र आणि नात्यांनी ओथंबलेलं वातावरण हाच ग्रामीण भागातील दिवाळीचा खरा गोडवा. मात्र, आता हे शहरांच्या गोंगाटात हरवले आहे. ग्रामीण भागातील नाती, सुगंध आणि साधेपणाचा गोडवाही हरवलेला दिसून येतो.

पूर्वीची दिवाळी म्हणजे आपुलकीचा, साधेपणाचा आणि नातेसंबंधांचा सण होता. घराघरांत एकत्र फराळ करणे, शेजाऱ्यांना पदार्थ चाखायला देणे, लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांनी मिळून सण साजरा करणे हीच खरी दिवाळी होती. मात्र हल्ली दिवाळी 'नावापुरती' राहिली आहे. गतीमान जीवनशैलीत नाती विरळ झाली आहेत. घरांतील आनंदाचे हास्यही कुठेतरी हरवले आहे. पूर्वी गावाच्या गल्लीबोळात दाट वस्ती, अंगणातील गुरेढोरे, बकऱ्या, फटाक्यांच्या आतषबाजीतील ते वातावरण सध्या हरवलेले दिसते. गावातील माती, चुलीवरील सुगंध आणि दिव्यांचा प्रकाश आता काँक्रिटच्या भिंती आणि रंगीबेरंगी लाईट्सनी घेतला आहे.



ग्रामीण भागातून शिकलेले तरुण शहरात नोकरीसाठी स्थायिक झाले. करिअरच्या धावपळीत गाव, नाती, आणि सणांचा तो उत्साह मागे राहिला आहे. सुट्ट्या न मिळाल्यामुळे अनेकांना आपल्या गावातली दिवाळी साजरी करता येत नाही. पण त्यांच्या बालपणीच्या गावातील मित्रमंडळी अजूनही त्यांच्या येण्याची वाट पाहतात." येतोय का यंदा भावड्या? " अशी चौकशी अजूनही गावातल्या चहाच्या टपरीवर होतान दिसते.

दरम्यान, शेतकऱ्यांना कापसाला भाव नाही, महागाई वाढली आहे आणि सणाचा आनंद आर्थिक ओझ्याखाली दडपला आहे. पूर्वी फराळासाठी आठवडाभर तयारी होत असे. लाडू, चिवडा, शंकरपाळे, अनारसे हे घराघरातल्या स्वयंपाकघरातून दरवळायचे. हल्ली मात्र कोणीही असे पदार्थ बनवताना दिसत नाही, रेडिमेड विकत घेण्यावरच कल दिसून येतो. पूर्वी मातीच्या घरातील दिव्यांचा मंद प्रकाश मनात उब आणणारा होता. आता त्याजागी आली आहेत रंगीबेरंगी सिरीयल लाईट्स. काही तरुणांनी आई-वडिलांना शहरातच स्थायिक केले. त्यामुळे अनेक गावातील घरे दिवाळीतही कुलूपबंद दिसतात. गावात अजूनही दिवे लागतात, पण त्या उजेडात अनेक चेहरे कायमचे विरून गेले आहेत. काळ बदलला, सणाचे स्वरूप बदलले, पण गावाच्या मातीतील खरी दिवाळी अजूनही त्या हरवलेल्या नात्यांची, साधेपणाची आणि माणुसकीच्या प्रकाशाची वाट पाहत आहेत, एवढे मात्र निश्चित!

टीईटीच्या अंमलबजावणीमुळे नवा वाद;

## आश्रमशाळांमधील शिक्षकांमध्ये संभ्रम!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मागासवर्गीय बहुजन कल्याण विभागाने आश्रमशाळांमध्ये (मागासवर्गीय मुलांसाठी शाळा) काम करणाऱ्या शिक्षकांसाठी शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) अनिवार्य करण्यासंबंधी परिपत्रक काढण्यात आले. या परिपत्रकामुळे नवा वाद निर्माण झाला आहे. राज्य सरकारच्या या नियमाला पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्याच्या भूमिकेमुळे शिक्षकांमध्ये नाराजी पसरली आहे. परिपत्रकात म्हटले आहे की, इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या सर्व शिक्षकांनी ज्यांनी अद्याप टीईटी उत्तीर्ण केलेली नाही. त्यांनी पुढील दोन वर्षांत ती उत्तीर्ण करावी, अन्यथा सक्तीची निवृत्ती घ्यावी. सर्वोच्च न्यायालयाच्या अलीकडील निर्णयाचा हवाला देत परिपत्रकात असे म्हटले की, हा नियम पाच वर्षांपेक्षा जास्त सेवा शिल्लक असलेल्या शिक्षकांना लागू होतो. पाच वर्षांपेक्षा कमी सेवा असलेले शिक्षक पदोन्नतीची मागणी न केल्यास टीईटीशिवाय नोकरीत राहू शकतात. या निर्णयामुळे आश्रमशाळांमध्ये काम करणाऱ्या शिक्षकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.

# जलवाहिन्या फुटल्याने पाणीपुरवठा विस्कळीत!



## ऐन दिवाळीत नागरिकांचे हाल; पालिकेकडून युद्धपातळीवर प्रयत्न

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर शहरास पाणीपुरवठा करणाऱ्या अमळगाव- गांधली रस्त्यावरील जलवाहिन्या फुटल्याने पाणीपुवठा विस्कळीत झाला आहे. यामुळे ऐन दिवाळीत नागरिकांचे हाल होत आहेत. पालिकेकडून जलवाहिन्या जोडण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. लवकरच पाणीपुरवठा सुरळीत होईल. नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन पालिकेकडून करण्यात आले आहे.

> " शहरास पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य जलवाहिन्यांना गळती लागली होती. यामुळे शहरातील पाणीपुरवठा विस्कळीत झाला होता. मात्र, जलवाहिन्या दुरुस्तीचे काम पालिकेतर्फे युद्धपातळीवर सुरू आहे. येत्या दोन दिवसांत पाणीपुरवठा सुरळीत होईल. नागरिकांनी संयम ठेवून पालिकेस सहकार्य करावे.
>
> **- तुषार नेरकर,**
> मुख्याधिकारी, अमळनेर.

> " जलवाहिन्या फुटल्याने पाणीपुरवठ्याला अडथळा निर्माण झाला होता. त्यातच डीओही उडाल्याने मोठ्या अडचणी आल्या होत्या. मात्र, आम्ही अहोरात्र काम करून जलवाहिन्या दुरुस्तीचे काम पूर्णत्वास नेले आहे. पंपही सुरू झाला असून, लवकरच नियमित पाणीपुवठा होईल.
>
> **- प्रवीणकुमार बैसाणे,**
> पाणीपुरवठा विभाग, नगरपालिका.

अमळनेर शहरास जळोद डोहातून पाणीपुरवठा केला जातो. मात्र, जळोद- अमळगाव- गांधली येथील जुन्या जलवाहिन्या फुटल्या होत्या. परिणामी चार दिवसाआड होणारा पाणीपुरवठा ऐन दिवाळीत सात दिवस लांबणीवर पडला. यामुळे नागरिकांचे विशेषतः महिलांना खूप हाल सोसावे लागले. दिवाळीत अनेकांकडे पाहुण्यांचे आगमन झाले आहे. मात्र, पाणीच नसल्याने त्यांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागले. अनेक कुटुंबांनी पिण्यासाठी बाजारात उपलब्ध असलेल्या पिण्याचे जार, बाटल्यांनी आपली तहान भागवली. वापरासाठी खासगी पाण्याच्या टँकरने पाणी मागवावे लागले. दरम्यान, शहरातील अनेक भागात भुयारी गटारी योजनेच्या कामामुळेही वारंवार जलवाहिन्या फुटल्याने पाणीपुरवठा विस्कळीत झाला होता. ही समस्या नित्याचीच झाली आहे. पालिका प्रशासनाचे याकडे लक्ष नाही, अशा संतप्त भावना गृहिणींनी व्यक्त केल्या. अनेक भागात तर फुटलेल्या जलवाहिन्यांमुळे नळांना गढूळ पाणी येत असल्याच्या तक्रारी होत आहेत. पालिकेने याबाबत गांभिर्याने लक्ष देऊन लवकरात लवकर पाणीपुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.



# आर्याने दिवाळीत उभारला सुंदर किल्ला!

**ग्लोबाल महातेज वृत्तसेवा**

दिवाळीचा सण आला की लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांनाच किल्ला बांधण्याची उत्सुकता लागते. अनेक ठिकाणी तर किल्ला बांधणीच्या स्पर्धाही घेतल्या जातात. मात्र, अमळनेर शहरात ही पारंपरिक कला आणि परंपरा आजही जपली आहे, माजी नगराध्यक्ष सुभाष भांडारकर यांच्या परिवाराने. अभिजित सुभाष भांडारकर यांची कन्या आर्या भांडारकर हिने दिवाळी निमित्ताने आपल्या परसदारी सुंदर भुईकोट किल्ला बांधला असून, या किल्ल्याद्वारे तिने आपल्या स्थापत्यकलेचे कौशल्य सादर केले आहे.

त्याचबरोबर छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याची आणि पराक्रमाची आठवणही जागवली आहे. हा किल्ला पाहण्यासाठी परिसरातील बालगोपाल आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली.

आर्याला किल्ला बांधण्यात ओम भांडारकर यानेही सहकार्य केले. दोघांच्या कल्पकतेचे आणि मेहनतीचे सर्वत्र कौतुक होत आहे. मुलांना किल्ला म्हणजे काय, त्यामागील इतिहास आणि शिवरायांच्या कार्याची ओळख व्हावी म्हणून आम्ही दरवर्षी मुलांना प्रेरित करतो, असे माजी नगराध्यक्ष सुभाष भांडारकर आणि अभिजित भांडारकर यांनी 'ग्लोबल महातेज ' शी बोलताना सांगितले. अमळनेर शहरात बहुधा यंदा बांधण्यात आलेला हा एकमेव किल्ला ठरला आहे. दिवाळीच्या पारंपरिक संस्कृतीचा सुंदर वारसा या किल्ल्यामुळे उजळून निघाल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

# भरिताची वांगी चक्क १०० रुपये किलो!

## प्रतिकूल हवामानामुळे उत्पादन घटल्याचा परिणाम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दिवाळीच्या तोंडावर थंडीची चाहूल लागली म्हणजे बाजारात भरिताची वांगी मोठ्या प्रमाणात विक्रीसाठी दाखल होऊ लागतात. त्यानुसार घरोघरी भरीत-पुरीचा बेत आखायला सुरूवात होते. शेतांमध्येही भरीत पार्ट्यांचे आयोजन केले जाते. हे चित्र बहुधा यंदा काहीसे दुर्मिळ होणार आहे. त्याचे कारणही तसेच आहे. प्रतिकूल हवामानामुळे उत्पादन घटल्याने



भरिताची वांगी आताच १०० रुपये प्रतिकिलोप्रमाणे अमळनेरसह जिल्हाभरातील विविध बाजारपेठांत विकली जात आहेत.

जिल्ह्यातील यावल, रावेर, मुक्ताईनगर, जामनेर, भुसावळ, पाचोरा आणि जळगाव तालुक्यात विशेषत्वाने भरिताच्या वांग्यांचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. हिवाळ्याच्या दिवसांत उत्पादन हाती येईल, या पद्धतीने संबंधित शेतकरी दरवर्षी साधारण जूनमध्ये भरिताच्या वांग्यांची रोप लागवड करतात. साधारणपणे जानेवारी-फेब्रुवारीपर्यंत बाजारात टप्प्या-टप्प्याने वांग्यांची आवक सुरू असते. हिवाळ्यात थंडी वाढल्यावर वांग्यांचे भरीत खाण्याची मजा काही वेगळीच असते. साहजिक थंडीचा जोर वाढल्यावर वांग्याचे भरीत आणि त्यासाठी आयोजित केल्या जाणाऱ्या शेती शिवारातील पार्ट्यांची रंगत वाढते. बाजारात भरिताची वांगी खरेदी करण्यासाठी ग्राहकांची अक्षरशः झुंबड उडते. खास भरीत-पुरी, कळण्याची भाकरी, मिरचीचा ठेचा आणि कढीचा मेनू ठेवणारी हॉटेल्सही उत्तम प्रकारे चालतात.

पान ३ वर

## आतील पानांत




# येत्या रविवारपासून दररोज जळगाव- मुंबई विमानसेवा

## जिल्ह्यातील प्रवाशांमध्ये आनंदी आनंद



ग्लोबल महातेज वृत्तसेवा

मुंबईसाठी अलायन्स एअर कंपनीकडून आठवड्यातून चार दिवस विमानसेवा दिली जात होती. मात्र, प्रवाशांकडून मिळालेल्या उत्तम प्रतिसादानंतर रविवार, दि. २६ ऑक्टोबरपासून जळगाव-मुंबई विमानसेवा दररोज सुरू होणार आहे. दोन महिन्यांपासून बंद असलेली जळगाव- अहमदाबाद विमानसेवा पुन्हा सुरू झाली आहे.

दिवाळीच्या काळात विशेषतः अहमदाबाद विमानसेवा सुरळीत झाल्याने प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे. उडान योजनेंतर्गत जळगाव विमानतळावरून गोव्यासह पुणे, हैदराबाद, मुंबई आणि अहमदाबाद या शहरांसाठी सध्या विमानसेवा सुरू आहे. मुंबईकडे व्यापार, उद्योग, शिक्षण,

पान ३ वर

### क्षमता वाढविण्यासाठी पाठपुरावा

जळगाव शहरातील विमानतळाचा विस्तार आणि सुविधा वाढविण्याबाबत खासदार स्मिताताई वाघ यांनी केंद्रीय नागरी विमान मंत्रालयाकडे पाठपुरावा केला होता. धावपट्टीच्या लांबीत वाढ करणे व विमानसेवेच्या फेऱ्या आणि एकुणच विमानतळाची क्षमता वाढविण्याच्या मागणीकडे त्यांनी केंद्राचे लक्ष वेधले होते. त्यानुसार, विमानतळाचा कृती आराखडा आता अंतिम टप्प्यात आहे. भविष्यात टर्मिनल आणि एप्रन उत्तरेकडे हलविण्याचा प्रस्ताव आहे. तसेच विमानतळाच्या पायाभूत सुविधांच्या विस्तारासाठी सविस्तर नियोजन करण्यात आले आहे. भविष्यात प्रवासी संख्या आणि विमानसेवेच्या वाढीच्या आवश्यकतेनुसार विमानतळाचा आणखी विस्तार करण्याची तयारी मंत्रालयाने दर्शवली आहे. विशेष म्हणजे सध्या कोणत्याही एअर लाइनकडून अतिरिक्त उड्डाणांसाठी प्रस्ताव आलेला नसला, तरी भविष्यात मागणी आल्यास त्यावर सकारात्मक विचार केला जाईल, असेही नागरी विमानन मंत्रालयाने स्पष्ट केले आहे.

## आपली दिवाळी, स्वदेशी दिवाळी

### दिवाळी आपल्यासाठीही अन् गरिबांसाठीही






स्वदेशीचा अंगीकार करीत
स्थानिक खरेदीला महत्त्व देऊया..
गरीब, कष्टकरी, मध्यमवर्गीय, छोटे उद्योजक,
छोटे व्यावसायिक, स्थानिक कारागीर,
महिला बचत गट यांच्या उत्पादनांना खरेदी
करूया.. त्यांच्या घरातही प्रकाशपर्व साजरे
करण्यासाठी आपण हातभार लावूया..
प्रकाशपर्व, आनंदपर्व आणि समृध्दीपर्व
म्हणजेच दिवाळी.. चला, जागे व्हा..!
परदेशी वस्तूंना झुगारूया.. ऑनलाईन
तथा विदेशी उत्पादनांच्या खरेदीऐवजी
स्वदेशीच उत्पादने खरेदी करूया..!

**स्वदेशी उत्पादने खरेदी करून देशाला आणि गरजूंना बळ देऊया...!**
**हीच खरी तुमची, आमची, आपल्या सर्वांचीच दिवाळी...!!**

# मसाला पान



# जमिनीचा नकाशा ऑनलाइन कसा पाहायचा ?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

शेतजमिनीच्या हद्दी जाणून घेणे किंवा शेतात जाण्यासाठी नवीन रस्ता काढणे यासाठी जमिनीचा नकाशा असणे शेतकऱ्यांसाठी अत्यंत आवश्यक आहे. पूर्वी सातबारा आणि आठ-अ उतारे मिळविण्यासाठी तलाठी कार्यालयात खेटे घालावे लागायचे. आता सरकारने डिजिटल क्रांतीच्या माध्यमातून सातबारा, आठ-अ आणि जमिनीचा नकाशा ऑनलाइन उपलब्ध करून दिला आहे. मात्र आपण गावाचा आणि शेतजमिनीचा नकाशा ऑनलाइन कसा पाहू शकतो? तो कसा वाचायचा? आणि सरकारचा ई-नकाशा प्रकल्प नेमका काय आहे ? हे सविस्तरपणे जाणून घेणे अतिशय महत्त्वपूर्ण आहे.

**ई-नकाशा प्रकल्प काय आहे?**

महाराष्ट्र सरकारच्या महाभूमी उपक्रमांतर्गत ई-नकाशा हा एक डिजिटल प्रकल्प आहे. शेतकरी आणि नागरिकांना त्यांच्या जमिनीचा नकाशा आणि संबंधित माहिती यामुळे ऑनलाइन मिळते. या सुविधेमुळे गट नकाशा, जमिनीच्या मालकीची माहिती, शेजारील गट क्रमांक आणि इतर तपशील सहजपणे उपलब्ध होतात. ही प्रक्रिया पारदर्शक आणि वेळ वाचविणारी आहे. ज्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीच्या हद्दी आणि मालकीबाबत स्पष्टता मिळते.

**जमिनीचा नकाशा ऑनलाइन कसा पाहावा ?**

जमिनीचा नकाशा ऑनलाइन पाहण्यासाठी खालील सोप्या पायऱ्या फॉलो करणे गरजेचे आहे.

**१) महाभूमी पोर्टलवर जा.**

- ब्राउझरमध्ये mahabhunakasha.ma-habhumi.gov.in हे संकेतस्थळ उघडावे.
- गुगलवर Mahabhunakasha असा शोध घेऊन अधिकृत संकेतस्थळाची लिंक निवडावी.

**२) गट क्रमांक टाका.**

- संकेतस्थळ उघडल्यानंतर मुख्य पृष्ठावर ' Search by Plot Number ' हा पर्याय दिसेल.
- येथे तुमच्या सातबारा उताऱ्यावरील गट क्रमांक (Survey Number) टाका आणि ' शोधा ' (Search) वर क्लिक करावे.
- यानंतर तुमच्या जमिनीचा गट नकाशा स्क्रीनवर दिसेल.

**३) नकाशा पाहणे आणि झूम करणे.**

- नकाशा पूर्ण पाहण्यासाठी ' Home ' पर्यायासमोरील आडव्या बाणावर क्लिक करावे.
- नकाशा मोठा किंवा छोटा करण्यासाठी झूम इन (+) किंवा झूम आऊट (-) बटणांचा वापर करावा.

**४) जमिनीची माहिती तपासणे.**

- डाव्या बाजूला ' Plot Info ' या रकान्यात तुमच्या गट क्रमांकाशी संबंधित माहिती दिसेल. यात खालील तपशील समाविष्ट असतात.
  - शेतजमीन कोणत्या शेतकऱ्याच्या नावावर आहे.
  - त्या शेतकऱ्याच्या नावावरील जमिनीचे क्षेत्रफळ.
  - गटातील इतर मालकांची यादी आणि त्यांच्या जमिनीचा तपशील.

**५) नकाशा अहवाल (Map Report) डाऊनलोड करणे.**

- डाव्या बाजूला ' Map Report ' हा पर्याय निवडावा.
- यावर क्लिक केल्यावर तुमच्या जमिनीचा प्लॉट अहवाल (Plot Report) स्क्रीनवर उघडेल.
- उजव्या बाजूला खाली दिशेने बाण (Down-ward Arrow) दिसेल. त्यावर क्लिक करून हा अहवाल तुम्ही डाऊनलोड करू शकता.

**६) शेजारील गट क्रमांक आणि इतर माहिती**

- अहवालात तुमच्या गटाला लागून असलेल्या इतर गटांचे क्रमांक (उदा.- ३२९, ३३८, ३४०, ३४१, ३४६, ३३६) नमूद केलेले असतात.
- तसेच गट नकाशातील प्रत्येक शेतकऱ्याच्या जमिनीचे क्षेत्रफळ आणि मालकीचा तपशील खालील भागात दिलेला असतो.

**जमिनीचा नकाशा वाचण्याची पद्धत**

- गट नकाशा : हा नकाशा तुमच्या जमिनीच्या हद्दी आणि शेजारील गटांचे स्थान दर्शवितो. यात जमिनीचे क्षेत्रफळ, आकार आणि सीमारेषा स्पष्ट होतात.
- मालकी माहिती : ' Plot Info ' मध्ये गटातील प्रत्येक मालकाचे नाव आणि त्याच्या जमिनीचे क्षेत्रफळ नमूद असते.
- शेजारील गट : शेजारील गट क्रमांकांमुळे तुमच्या जमिनीच्या सीमा आणि त्याला लागून असलेल्या जमिनींची माहिती मिळते.

**ई-नकाशा प्रकल्पाचे फायदे**

- सुलभता : शेतकऱ्यांना घरबसल्या जमिनीचा नकाशा आणि मालकीची माहिती मिळते.
- पारदर्शकता : डिजिटल नकाशामुळे जमिनीच्या हद्दी आणि मालकीबाबत गैरसमज टाळले जातात.
- वेळेची बचत : तलाठी कार्यालयात जाण्याची गरज नाही. सर्व माहिती ऑनलाईन उपलब्ध आहे.
- रस्ता नियोजन : नवीन रस्ता काढण्यासाठी किंवा हद्दी निश्चित करण्यासाठी नकाशा उपयुक्त ठरतो.

**सावधगिरी आणि टिप्स**

- सातबारा उताऱ्यावरील गट क्रमांक आणि गावाचे नाव बरोबर टाकण्याची खात्री करा.
- संकेतस्थळ वापरताना इंटरनेट कनेक्शन स्थिर असावे.
- डाऊनलोड केलेला नकाशा आणि अहवाल काळजीपूर्वक तपासा आणि आवश्यकतेनुसार प्रिंट घ्या.

महाभूमीच्या ई-नकाशा प्रकल्पामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा नकाशा आणि माहिती मिळविणे खूपच सोपे झाले आहे. गट नकाशा, मालकी तपशील आणि शेजारील गटांची माहिती यामुळे जमिनीच्या व्यवहारात पारदर्शकता आणि स्पष्टता आली आहे. या डिजिटल सुविधेचा वापर करून शेतकरी आपल्या जमिनीच्या हक्कांचे रक्षण करू शकतात. रस्ता नियोजनासारख्या कामांसाठी योग्य निर्णय घेऊ शकतात.

# वेदनारहित, जगातील सर्वांत जड हाडांचा मासा : मोला-मोला

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ज्याला ' सनफिश ' असे म्हटले जाते तो मासा म्हणजेच ' मोला-मोला '. हा समुद्रातील एक आश्चर्यकारक मासा आहे. जगातील सर्वांत जड हाडे असलेला हा मासा आहे. याचे वजन २००० किलोपर्यंत असते. या माशाची खासीयत म्हणजे त्याच्या त्वचेत संवेदनशील मज्जातंतू (नर्व्हस सिस्टीम) जवळपास नसतात. त्यामुळे त्याला वेदना जाणवत नाहीत. परिणामी काही मासे त्याला जीवंतपणे खात असतानाही तो कोणत्याही त्रासाशिवाय समुद्रात पोहत राहतो.

## वेदनारहिततेचे रहस्य

मोला-मोलाची मज्जासंस्था (नर्व्हस सिस्टीम) अत्यंत मंदगतीने कार्य करते. ज्यामुळे त्याला शारीरिक जखमांचा त्रास जाणवत नाही. ही खासीयत त्याला समुद्रातील इतर शिकारी माशांपासून स्वतःचे संरक्षण करण्याऐवजी त्यांच्यासोबत सहअस्तित्व राखण्यासाठी मदत करते. त्याच्या या वैशिष्ट्यामुळे त्याला वेदनारहित मासा, असेही म्हटले जाते.



## मोला-मोलाचे वैशिष्ट्यपूर्ण शरीर अन् आहार

मोला-मोलाचे शरीर विचित्र आणि विशाल आहे. मात्र त्याच्या वजनाच्या तुलनेत त्यात फक्त १०० किलोपर्यंतच खाण्यायोग्य मांस असते. याचा मुख्य आहार जेलीफिश आहे. जे पौष्टिकदृष्ट्या कमी दर्जाचे आहे. त्यामुळे मोला-मोलाला सतत खावे लागते. तो दररोज हजारो लिटर पाणी गाळून (फिल्टर करून) त्यातून जेलीफिश शोधतो. यासाठी त्याला अविरत पोहत राहावे लागते. हा मासा अनेकदा समुद्राच्या पृष्ठभागावर सूर्यप्रकाशात तरंगताना दिसतो. यामुळे त्याचे शरीर ऊबदार राहते. त्यातून त्याच्या त्वचेला चिकटलेले ४० हून अधिक प्रकारचे परजीवी कमी होण्यास मदत होते.

## समुद्रातील कचरा ?

मोला-मोलाला काही ठिकाणी समुद्रातील कचरा, असे म्हटले जाते. कारण त्याच्या मांसाला चव नसते. मासेमारी करणारे हा मासा जाळ्यात सापडला तरी त्याला परत समुद्रात टाकतात. त्याला कोणतेही व्यावसायिक मूल्य नाही. मात्र तरीही या माशाची प्रजाती समुद्रात टिकून आहे. याचे कारण म्हणजे त्याची प्रचंड प्रजनन क्षमता. मोला-मोलाची मादी एकाच वेळी ३० कोटींपेक्षा जास्त अंडी देते. जगातील ही सर्वांत मोठी अंड्यांची संख्या आहे. त्यामुळे मोला-मोलाची populatio समुद्रात कायम टिकून राहते.

## मोला-मोलाचे पर्यावरणातील स्थान

मोला-मोला हा मासा समुद्राच्या पर्यावरणात महत्त्वाची भूमिका बजावतो. जेलीफिश हा त्याचा मुख्य आहार असल्याने तो समुद्रातील जेलीफिशच्या संख्येवर नियंत्रण ठेवण्यास मदत करतो. त्याच्या शरीरावर चिकटलेले परजीवी हे इतर छोट्या माशांसाठी खाद्य ठरतात. ज्यामुळे समुद्री अन्नसाखळीचा समतोल राखला जातो. त्याच्या विशाल आकारामुळे आणि विचित्र स्वरूपामुळे मोला-मोला समुद्रशास्त्रज्ञ आणि पर्यटकांसाठी नेहमीच आकर्षणाचा विषय असतो.

मोला-मोला हा मासा त्याच्या अनोख्या वैशिष्ट्यांमुळे आणि वेदनारहित स्वभावामुळे समुद्रातील एक रहस्यमय प्राणी आहे. त्याची प्रचंड प्रजनन क्षमता, विशाल आकार आणि पर्यावरणातील भूमिका यामुळे तो समुद्री जैवविविधतेचा महत्त्वाचा भाग आहे. मोला-मोला यास समुद्रातील कचरा, म्हटले जात असले, तरी त्याचे अस्तित्व समुद्राच्या नाजूक संतुलनासाठी आवश्यक आहे. हा मासा आपल्याला निसर्गाच्या विविधतेची आणि त्यातील चमत्कारांची जाणीव करून देतो.

# स्मृती मंधानाचे लग्न ठरले!

## इंदूरची सून होणार; पलाश मुच्छलशी बांधणार लग्नगाठ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय महिला क्रिकेट संघाची स्टार खेळाडू स्मृती मंधाना हिच्या लग्नाचा सस्पेन्स अखेर संपला आहे. स्मृती इंदूरची सून होणार आहे. ती प्रसिद्ध संगीतकार पलाश मुच्छल याच्याशी लग्नगाठ बांधणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. स्मृतीच्या चाहत्यांसाठी ही बातमी आनंदासह धक्कादायकही आहे.

**स्मृती मंधाना : क्रिकेटपटू ते इंदूरची सून**

स्मृती मंधाना ही सांगलीची कन्या आहे. तिने वयाच्या २९ व्या वर्षी क्रिकेटच्या मैदानावर अनेक विश्वविक्रम रचले. स्थानिक क्रिकेटपासून भारतीय संघापर्यंत तिचा प्रवास थक्क करणारा आहे. तिने एकामागून एक रेकॉर्ड रचत आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये स्वतःचे स्थान निर्माण केले. ' नॅशनल क्रश ' आणि ' लाखो दिलोंकी धडकन ' अशी बिरुदे मिळविणाऱ्या स्मृतीच्या लग्नाच्या बातम्यांनी चाहत्यांच्या मनात खळबळ उडविली आहे.

**पलाश मुच्छल यांच्यासोबत लग्न**

काही दिवसांपूर्वी स्मृती आणि बॉलीवूड संगीतकार पलाश मुच्छल यांच्या सोशल मीडिया पोस्टमुळे त्यांच्या अफेअरच्या चर्चांना उधाण आले होते. पलाश, जो स्वतः इंदूरचा रहिवासी आहे. तो नुकताच आपल्या चित्रपटाच्या प्रमोशनसाठी इंदूरला गेला होता. त्यावेळी पत्रकारांनी त्याला स्मृतीबाबत विचारले असता, त्याने स्पष्टपणे सांगितले, की स्मृती मंधाना इंदूरची सून होणार आहे एवढेच मी सध्या सांगू शकतो. मी तुम्हाला हेडलाइन तर दिली आहे! या विधानाने स्मृतीचे लग्न पलाशसोबतच होणार असल्याचे जवळपास निश्चित झाले आहे.

**चाहत्यांचा संमिश्र प्रतिसाद**

स्मृतीच्या लग्नाच्या बातमीने तिच्या चाहत्यांमध्ये आनंद आणि आश्चर्य अशा संमिश्र भावना दिसत आहेत. सोशल मीडियावर #Sm-ritiMandhana आणि #PalashMuchhal या हॅशटॅग्ससह चर्चा जोरात सुरू आहे. एका चाहत्याने लिहिले, की स्मृती आणि पलाश एकत्र? ही तर परफेक्ट जोडी आहे! तर दुसऱ्या चाहत्याने मजेशीर कमेंट केली, आता स्मृतीच्या सिक्सरसोबत पलाशचे संगीतही हिट होणार.



## स्मृती आणि पलाश : एक परिपूर्ण जोडी

स्मृती मंधाना ही क्रिकेटच्या मैदानावर आपल्या आकर्षक खेळासाठी ओळखली जाते. पलाश मुच्छल बॉलीवूडमधील आपल्या मधुर संगीतासाठी प्रसिद्ध आहे. या दोन क्षेत्रांतील दिग्गजांचे मीलन निश्चितच लक्षवेधी ठरणार आहे. स्मृतीचे इंदूरशी नाते जोडले जाणार असल्याने तिच्या चाहत्यांना आता तिच्या नव्या आयुष्याची उत्सुकता लागली आहे. येत्या काळात या जोडीच्या लग्नाच्या तारखा आणि समारंभाबाबत अधिक माहिती मिळेल, अशी अपेक्षा आहे.

## जगप्रसिद्ध गुन्हेगार व त्यांच्या लाइफस्टाइल

- **पाब्लो एस्कोबार :** कोलंबियाचा ड्रग लॉर्ड
- **जन्म :** १ डिसेंबर १९४९, रियोनेग्रो, कोलंबिया
- **गुन्हेगारी शैली :** कोकीन तस्करी, हत्याकांड, ब्लॅकमेलिंग.
- **लाइफस्टाइल :** आलिशान हवेली, खासगी विमान, शाही वाहने. गरिबांसाठी शाळा, रुग्णालये उभारून लोकांचे समर्थन मिळविले.
- **विशेष तथ्य :** रॉबिन हूडसारखी छबी निर्माण केली. परंतु क्रूर अपराध करीत होता. **अत्यंत गुंतागुंतीचे व्यक्तिमत्त्व :** क्रूरता आणि दान हे दोन्ही एकाच व्यक्तीत.

## प्रसिद्ध भारतीय खेळाडूंचे विनोदी किस्से...

महेंद्रसिंग धोनी ' कॅप्टन कूलचा चप्पल किस्सा '
धोनीचा शांत स्वभाव सर्वांना माहीतच आहे.
एकदा नेट प्रॅक्टिस दरम्यान रवींद्र जडेजाने त्याचे चप्पल चुकून घेतले. धोनी हसत म्हणाला, ' जडेजा, तुझे बॅटिंग चांगले आहे. पण चप्पलचे रन रेट कमी आहे. ' जडेजा हसून म्हणाला, ' माही भैया, या चप्पलने मीही शतक ठोकतो '.
संपूर्ण टीम खदखदून हसली.

# कांतारा ने तोड़ा ऋतिक रोशन और विक्की कौशल का रिकॉर्ड

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

क्या ऋषभ शेट्टी की ' कांतारा : चैप्टर १ ' ने ऋतिक रोशन, विक्की कौशल, आमिर खान, अक्षय कुमार और अजय देवगन जैसे सुपरस्टार्स की फिल्मों को पछाड़ दिया? आइए जानते हैं...

**बॉक्स ऑफिस पर धमाका**

ऋषभ शेट्टी की ' कांतारा : चैप्टर १' ने २ अक्टूबर २०२५ को रिलीज होताच बॉक्स ऑफिस पर तहलका मचा दिया। फिल्म ने पहले दिन लगभग ६० करोड़ रुपये की नेट कमाई की, जो २०२५ की तीसरी सबसे बड़ी ओपनिंग है। हिंदी बेल्ट में भी फिल्म ने १९-२१ करोड़ रुपये कमाए, जिसमें नाइट शोज के बिना ऑक्यूपेंसी २८-३०% रही। दशहरा और गांधी जयंती के मौके पर दक्षिण भारत में हाउसफुल शोज देखने को मिले।

**किन फिल्मों को छोड़ा पीछे?**

विक्की कौशल की ' छावा ' : ३१-५२ करोड़ रुपये की ओपनिंग, लेकिन कांतारा ने इसे मात दी।

ऋतिक रोशन की ' वार २ ' : ५२ करोड़ रुपये की ओपनिंग के साथ यह भी पीछे रही।

अन्य फिल्में : अजय देवगन की ' रेड २ ' (१९.२५ करोड़), आमिर खान की ' सितारे जमीन पर ' (१०.७ करोड़) और अक्षय कुमार की ' स्काई फोर्स ' (१२.२५ करोड़) की ओपनिंग से भी कांतारा ने बाजी मारी।

**पहली कांतारा से तुलना**

२०२२ की ' कांतारा ' ने हिंदी में सिर्फ १.२७ करोड़ रुपये की ओपनिंग की थी, जबकि ' कांतारा : चैप्टर १ ' ने १४००% ज्यादा कमाई की। पहली फिल्म ने लाइफटाइम ८१.१ करोड़ रुपये कमाए थे। अब देखना यह है कि यह प्रीक्वल कितने दिनों में यह रिकॉर्ड तोड़ता है। वर्ड ऑफ माउथ के दम पर फिल्म के वीकेंड में १०० करोड़ पार करने की उम्मीद है।




' कांतारा : चैप्टर १ ' ने कन्नड़ सिनेमा की ताकत दिखाई और पैन-इंडिया स्तर पर बॉलीवुड के बड़े सितारों को चुनौती दी। ऋषभ शेट्टी की यह फिल्म स्टोरी, दमदार परफॉर्म और सांस्कृतिक गहराई के साथ दर्शकों का दिल जीत रही है।

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# कोर्ट मॅरेजनंतर नवरी फरार; शेतकऱ्याच्या मुलाची लाखोंची फसवणूक!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

लग्नाचे आमिष दाखवून शेतकरी कुटुंबाला फसविणारी टोळी उघडकीस आली. सिडको परिसरात २४ सप्टेंबरला घडलेल्या या प्रकरणात कोर्ट मॅरेजनंतर नवरी रस्त्यातच महागड्या गाडीतून फरार झाली. नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील शेतकरी कुटुंबाने ३ लाख ८६ हजार रुपयांचा ऐवज दिला, तरी नवरी गायब झाली. सिडको पोलिस ठाण्यात १८ ऑक्टोबरला तीन महिलांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वरिष्ठ पोलिस निरीक्षक अतुल येरमे यांनी सांगितले, की आरोपी महिलांनी बनावट ओळखीने लग्न जमवले आणि पैशांसह सोन्याचे दागिने हिसकावून नवरी पळविली.

**आरोपींची नावे व पार्श्वभूमी**

योती राजू गायकवाड (बोगस नाव : ज्योती मिसाळ, रा. हर्षनगर, छत्रपती संभाजीनगर), माया मधुकर शिंदे (नवरी, रा. दुसरबीड, ता. सिंदखेडराजा, जि. बुलडाणा), सविता मधुकर शिंदे (रा. दुसरबीड, ता. सिंदखेडराजा, जि. बुलडाणा), फिर्यादी शेतकरी

**एकूण व्यवहार**
- १ लाख रोख,
- ३० हजार फोन पे
- ५० हजार मित्रामार्फत
- १ लाख ७९ हजारांचे दागिने
- कपडे व भेटवस्तूंसाठी १० हजार

पत्नी व दोन मुलांसह शेती करून उदरनिर्वाह करतात. त्यांचा मुलगा महेश (नाव बदललेले) याच्या लग्नासाठी शेतात काम करणाऱ्या एका महिलेकडून ओळख झाली. तिने फोटो व बायोडेटा दिला. ज्यामुळे मुलगी पसंत पडली. मुलीची मावशी म्हणून ज्योती गायकवाडचा संपर्क दिला गेला.

**फसवणुकीची कथा**

२३ सप्टेंबरला सिडकोतील ज्योतीच्या घरी फिर्यादी कुटुंब सिदडली. तेथे ज्योती, रेखा मिसाळ आणि नवरी माया हजर होत्या. मुलीच्या वडिलांचे निधन झाल्याचे आणि आईवर उपचार चालू असल्याचे सांगितले. मुलगी पसंत पडल्यावर आरोपींनी आईच्या उपचारांसाठी एक लाख ८० हजार रुपयांची मागणी केली. कोर्ट मॅरेज ठरले. वकिलाला पाच हजार पाठविले गेले. २४ सप्टेंबरला सकाळी जिल्हा न्यायालयासमोर सर्वजण जमले. वकील तलवार यांनी कागदपत्रे घेतली आणि १२ हजार फी घेतली. लग्नानंतर कुटुंब सिडसह गावी निघाले. शहराबाहेर हॉटेलवर चहा पिण्यासाठी थांबताच पांढरा विनाक्रमांक स्कॉर्पिओ गाडी आली आणि माया तिच्यात बसून फरार झाली.



**तक्रार का उशिरा?**

बदनामीच्या भीतीने कुटुंबाने सुरूवातीला तक्रार दिली नाही. काही दिवसांत कोपरगाव (अहिल्यानगर) येथे अशाच फसवणुकीची टोळी पोलिसांच्या हाती लागली. नातेवाईकांसह तेथे जाऊन ओळख झाल्यावर सिडको पोलिसांकडे तक्रार दाखल केली. पोलीस निरीक्षक येरमे यांनी गुन्हा नोंदविला असून, तपास सुरू केला आहे. हा प्रकार शेतकरी कुटुंबांच्या लग्नाच्या शोधातील असुरक्षिततेचे दर्शन घडवतो. पोलिसांनी आरोपी महिलांना शोधण्यास सुरूवात केली आहे. इतर संभाव्य पीडितांना पुढे येण्याचे आवाहन केले आहे. अशा फसवणुकीविरुद्ध सावध राहा आणि लग्नाच्या व्यवहारात कागदोपत्री करार करा.

पान १ वरून

## येत्या रविवारपासून दररोज जळगाव–मुंबई विमानसेवा

मंत्रालयीन कामकाज तसेच वैद्यकीय उपचारांसाठी मोठ्या प्रमाणात प्रवाशांची वर्दळ असते. त्यामुळे मुंबईसाठी दररोज विमानसेवा सुरू झाल्यामुळे प्रवाशांना केवळ दीड तासांत मुंबई गाठता येणार आहे. जळगाव आणि मुंबई या शहरांमधील प्रवास आणखी सोयीस्कर आणि वेगवान होणार आहे. मुंबई विमानतळावरून सायंकाळी ७ वाजून १० मिनिटांनी जळगावसाठी विमान उड्डाण घेईल. रात्री ८ वाजून २५ मिनिटाला जळगाव विमानतळावर पोहोचेल. त्याचप्रमाणे जळगावहून मुंबईसाठी रात्री ८ वाजून ५० मिनिटांनी विमान उड्डाण घेईल. मुंबई विमानतळावर रात्री १० वाजून १० मिनिटाला पोहोचेल. सध्या २६ ऑक्टोबरपर्यंत मुंबईहून जळगावसाठी रविवार, सोमवार, बुधवार आणि शुक्रवारी विमानसेवा सुरू आहे. जळगावहून मुंबईसाठी रविवार, सोमवार, बुधवार आणि शुक्रवारी विमानसेवा सुरू राहील. याशिवाय, जळगाव विमानतळावरून आठवड्यातून चार दिवस सायंकाळी ७ वाजून २० मिनिटांनी अहमदाबादसाठी विमान उड्डाण घेईल. ही सेवा जळगावहून रविवार, मंगळवार, गुरुवार आणि शनिवारी सुरू असेल. तर अहमदाबाद विमानतळावरून आठवड्यातून चार दिवस सायंकाळी ५ वाजून ४० मिनिटांनी जळगावसाठी विमान उड्डाण घेईल. सायंकाळी ६ वाजून ५५ मिनिटांनी जळगाव विमानतळावर पोहोचेल. अहमदाबादहून ही सेवा रविवार, मंगळवार, गुरूवार आणि शनिवारी सुरू असेल.

## भरिताची वांगी चक्क १०० रुपये किलो!

यंदाही बऱ्याच शेतकऱ्यांनी खास गावरान वांग्यांच्या बियाण्यापासून तयार केलेल्या रोपांची लागवड जूनमध्ये शेतांमध्ये केली होती. परंतु सप्टेंबरमधील सततच्या ढगाळ हवामानासह अतिपावसामुळे मोठ्या प्रमाणात वांग्यांना बाधा पोहोचली. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आशेवर पाणी फिरले आहे. सध्या बाजारात जेवढी वांगी विक्रीसाठी येत आहेत, ती उन्हाळी लागवडीची आहेत.



## श्रीराम मंदिरात महिलांनी साजरी केली ‘दिवाळी पहाट’

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पौराणिक काळापासून दिवाळी सणाला हिंदू संस्कृतीत विशेष स्थान आहे. प्रभू श्रीरामचंद्र रावणाचा वध करून अयोध्येत परतले. यावेळी रयतेने रांगोळ्या, हार-तोरणे आणि दीप-पणत्या लाऊन त्यांचे स्वागत केले होते. हीच परंपरा जपण्यासाठी आणि पुढील पिढीपर्यंत पौराणिक महत्व पोहोचवण्यासाठी अमळनेर येथील महिलांनी राम मंदिरात ‘दिवाळी पहाट’ उत्साहात साजरी केली. नाथपंथीय समाजाच्या उत्तर महाराष्ट्र महिला महासंघाच्या अध्यक्षा सौ. शोभाताई रघुनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून “ पहिला दिवा श्रीरामाला ” हा उपक्रम राबविण्यात आला. महिलांनी या उपक्रमात स्वयंस्फूर्तीने सहभाग नोंदवला. दरवर्षी राम मंदिरात ‘दिवाळी पहाट’ मोठ्या प्रमाणात साजरी व्हावी, यात शहरातील विविध सामाजिक संस्था व नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहनही महिलांनी केले आहे. याप्रसंगी रुपाली जोशी, प्रतिमा साळवी, वैशाली चौधरी, स्वाती पोळ, भारती कार्लेकर, सोनाली साळुंखे, दिव्या बडगुजर, नंदा गायकवाड, उज्वला शिरोडे आदी उपस्थित होत्या. वृक्षवल्लीच्या अध्यक्षा नीलिमा सोनकुसरे आणि अपेक्षा पवार यांचे विशेष सहकार्य लाभले.

– अमळनेर येथील बाजार समिती ते तिरंगा चौक दरम्यानच्या रस्त्यावर मोकाट जनावरे सर्रास वावरत आहेत. त्यांचा वाहन चालकांसह पादचाऱ्यांना त्रास होत आहे.

## पाकिस्तानात सोन्याचा दर गगनाला; प्रतितोळा किंमत ऐकून थक्क व्हाल!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



जगभरात सोन्याच्या किमतींनी उच्चांक गाठला आहे. भारतात सोन्याचा दर प्रतितोळा एक लाख रुपयांपेक्षा जास्त झाला आहे. मात्र, भारताचा शेजारी आणि प्रतिस्पर्धी देश असलेल्या पाकिस्तानातील सोन्याच्या किमती ऐकून तुम्ही थक्क व्हाल. आंतरराष्ट्रीय बाजारातील तेजी आणि स्थानिक आर्थिक परिस्थितीमुळे पाकिस्तानात सोन्याचे दर प्रचंड वाढले आहेत.

**पाकिस्तानातील सोन्याचा दर**

कराची सराफ बाजारातील ताज्या माहितीनुसार पाकिस्तानात २४ कॅरेट सोन्याचा दर प्रतितोळा सुमारे २ लाख ५२ हजार पाकिस्तानी रुपये (अंदाजे ७५ हजार -८० हजार भारतीय रुपये) आहे. भारतातील सोन्याच्या किमतींच्या तुलनेत हा दर कमी आहे. मात्र तरीही पाकिस्तानच्या आर्थिक परिस्थितीत हा दर स्थानिक बाजारात खळबळ माजवणारा आहे. (टीप : मूळ वृत्तातील ४,४२,८९६ भारतीय रुपये हा आकडा अतिशयोक्तीपूर्ण आणि चुकीचा वाटतो. कारण ताज्या माहितीनुसार पाकिस्तानात सोन्याचा दर प्रतितोळा सुमारे २.५ लाख पाकिस्तानी रुपये आहे. जे भारतीय चलनात ७५ हजार-८० हजार रुपये आहे.)

**सोन्याच्या किमती वाढण्याची कारणे**

आंतरराष्ट्रीय बाजार : अमेरिकन फेडरल रिझर्व्हच्या व्याजदर कपातीच्या अपेक्षा, डॉलरच्या मूल्यातील घसरण आणि मध्यवर्ती बँकांकडून मोठ्या प्रमाणात सोन्याची खरेदी. स्थानिक परिस्थिती : पाकिस्तानात सोन्याची आयात महाग झाल्याने स्थानिक बाजारात किमती **नियंत्रणाबाहेर गेल्या आहेत.**

मागणी : किरकोळ गुंतवणूकदारांची वाढती मागणी आणि भू-राजकीय अनिश्चितता. ऑल पाकिस्तान सराफा जेम्स अँड ज्वेलर्स असोसिएशन (एपीएसजीजेए) नुसार गेल्या दोन-तीन महिन्यांपासून पाकिस्तानात सोन्याचा दर सातत्याने वाढत आहे. स्थानिक मागणी आणि जागतिक बाजारातील अस्थिरतेमुळे सोन्याच्या किमतींवर दबाव वाढला आहे.

## मांसाहारी बिर्याणी दिल्याचा राग; तरुणाकडून हॉटेलमालकावर गोळीबार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



झारखंडमधील रांची शहराच्या कांके रोडवरील चौपाची रेस्टॉरेंटमध्ये शनिवारी रात्री उशिरा घडलेल्या घटनेत हॉटेल मालकाच्या निधनाची खबर आली आहे. मरणाऱ्या मालकाचे नाव विजय नाग आहे, तर आरोपी तरुणाचे नाव अभिषेक असून त्याला अटक झाली नसून पोलिस त्याचा शोध घेत आहेत.

**घटना कशी घडली?**

शनिवारी रात्री काही तरुण चौपाटी रेस्टॉरन्टमध्ये जेवायला गेले होते. अभिषेकने शाकाहारी बिर्याणी ऑर्डर केली. परंतु कर्मचाऱ्यांनी त्याला मांसाहारी बिर्याणी दिली. या चुकीमुळे अभिषेकचा रेस्टॉरन्टच्या कर्मचाऱ्यांशी वाद सुरू झाला, जो हाणामाणीत बदलला. या वादात मध्यस्थी करण्यासाठी हॉटेल मालक विजय नाग पुढे आले. त्यावेळी अभिषेकने त्यांच्यावर गोळीबार केला. विजय नाग जखमी अवस्थेत रुग्णालयात भर्ती झाले, परंतु उपचारात त्यांनी शेवटी यशस्वी होऊ नका करून निधन झाले.

**वर्तमान स्थिती**

घटनेनंतर अभिषेक फरार झाला असून, पोलिस त्याचा शोध घेत आहेत. या प्रकारामुळेए परिसरात खळबळ उडाली असून पोलिसांनी प्रभावी तपास सुरू केला आहे. वैज्ञानिक कारणे, प्रत्यक्षदर्शींच्या विधानांची पडताळणी, सीसीटीव्ही फुटेज आणि मोबाईल डेटा यांचीही तपासणी केली जात आहे. मृत व्यक्ती आणि आरोपी यांच्या विरोधातील गुन्हेगाठीच्या नोंदी तपासण्यासही पुढील तपासणी चालू आहे. अशा प्रकारच्या हिंसाचारामुळे समाजात असुरक्षितता वाढते. कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी स्थानिक प्रशासन कडक प्रयत्न करत आहे. या घटनेबद्दल अधिक माहिती मिळाल्यानंतर अधिक स्पष्ट अहवाल दिला जाईल.

## वरिष्ठ अधिकाऱ्याच्या पत्नीची कमाई थक्क करणारी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

राज्यातील एका वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्याच्या पत्नीच्या कमाईचे आकडे समोर आल्याने अनेकजण थक्क झाले आहेत. माजी आयुक्त अनिलकुमार पवार यांच्या पत्नी भारती या महिन्याला सुमारे ८५ ते ९० लाख रुपये कमावतात, असा खुलासा अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) चौकशीत झाला आहे. अनिलकुमार पवार यांना १३ ऑगस्ट रोजी ईडीने अटक केली होती. दोन महिन्यांहून अधिक काळ त्यांना ताब्यात ठेवण्यात आले. मात्र, अलीकडेच मुंबई उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाने त्यांची अटक बेकायदेशीर ठरवली. याचवेळी भारती पवार यांच्यावर मनी लॉन्ड्रिंगचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. ईडीने त्यांना अटक न करता पाच वेळा चौकशीसाठी बोलावले. तेव्हा त्यांनी आपल्या उत्पन्नाचे तपशील सादर केले.

**भारती पवार यांच्या उत्पन्नाचे तपशील (मासिक) :**

| | |
|---|---|
| ■ बीएसआर रिॲलिटी | : २०-२५ लाख रुपये |
| ■ जनार्दन ॲग्रो सर्व्हिसेस | : २०-२५ लाख रुपये |
| ■ श्रृतिका एंटरप्रायजेस | : ३०-३५ लाख रुपये |
| ■ कृषी उत्पन्न (वार्षिक) | : ५०-६० लाख रुपये |

या आकडेवारीनुसार भारती पवार यांची वार्षिक कमाई अंदाजे १०.८ कोटी रुपये, तर मासिक कमाई ८५-९० लाख रुपये आहे. ईडी या प्रचंड उत्पन्नाच्या स्रोतांचा आणि त्यामागील आर्थिक व्यवहारांचा सखोल तपास करत आहे.


## तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

**बातमीसाठी संपर्क :**
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

**जाहिरातीसाठी संपर्क :**
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234



ग्लोबल महातेज
आजच...! आपली जाहिरात बुक करा
दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास
‘ चमकण्याची ’ तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची सुवर्णसंधी...!

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १) | पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) | अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) | पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) | 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) | 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) | 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) | ३ वर्षांखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) | शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) | लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) | उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!! डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234
वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.




# लक्ष्मी मातेचा कोप टाळायचा असल्यास लगेच फेका बाहेर ‘ या ’ ५ वस्तू!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दिवाळी हिंदू धर्मातील सर्वांत मोठा, आनंद आणि समृद्धीचा उत्सव. प्रत्येक वर्षी कार्तिक अमावास्येला येणाऱ्या या पवित्र सणाची आतुरतेने वाट पाहिली जाते. या दिवशी लक्ष्मीमातेची आणि श्री गणपती बाप्पांची विधीवत पूजा केली जाते. श्रद्धेने पूजन केल्यास घरात धन, सौख्य, समाधान आणि समृद्धीचा वास होतो, असे शास्त्र सांगते. आता दिवाळी अगदी दारात आली आहे. सर्व जण घरांची साफसफाई करण्यात मग्न आहेत. मात्र घरातील काही वस्तू अशा असतात, की ज्या लक्ष्मी माता यांना अजिबात आवडत नाहीत. या वस्तू जर घरात ठेवल्या तर लक्ष्मी माता यांचा आशीर्वाद तर लांबच, उलट नकारात्मकता घरभर पसरते. त्यासाठी दिवाळीपूर्वी या ५ वस्तू घरातून लगेच बाहेर काढा. अन्यथा श्रीमंतीऐवजी दारिद्र्य तुमचे दार ठोठावेल.

### घरात ‘ या ’ ५ वस्तू ठेवू नका

१) **फुटलेला आरसा :** वास्तुशास्त्रानुसार घरात फुटलेला आरसा ठेवणे अत्यंत अशुभ मानले जाते. आरशातील प्रतिबिंब म्हणजे सकारात्मक ऊर्जा आणि तोच आरसा फुटला तर ती ऊर्जा नष्ट होते. फुटलेला आरसा घरात ठेवला तर वाद, तणाव आणि अपयश वाढते. लक्ष्मीमातेचा आशीर्वाद दूर राहतो. त्यामुळे दिवाळीपूर्वी घरातील सर्व फुटलेले आरसे लगेच बाहेर फेकून द्या.

२) **बंद घड्याळ :** घरात बंद पडलेले घड्याळ म्हणजे थांबलेला काळ. वास्तुशास्त्र सांगते, की घरातील बंद घड्याळ जीवनातील प्रगती थांबवते. अशा घड्याळामुळे घरात स्थैर्याचा अभाव येतो. त्यामुळे दिवाळीपूर्वी सर्व बंद घड्याळे चालू करून घ्या किंवा न चालणारी बाहेर काढा. लक्ष्मी माता यांना वेळेचे महत्त्व कधीच विसरायला आवडत नाही.

३) **जुने किंवा तुटके फर्निचर :** घरातील तुटके-फुटके फर्निचर म्हणजे स्थिरतेचा अभाव. अशा वस्तूंनी घरात अडकलेली ऊर्जा तयार होते, जी नकारात्मकतेचे कारण बनते. लक्ष्मी माता जेथे नकारात्मक ऊर्जा असते तेथे कधीच वास करत नाहीत. त्यासाठी जुने, मोडकळीस आलेले फर्निचर दिवाळीपूर्वी घरातून काढून टाका.

४) **खंडित मूर्ती :** देव-देवतांच्या खंडित मूर्ती घरात ठेवणे अत्यंत अपशकुन मानले जाते. अशा मूर्तींमुळे देवतांचा आशीर्वाद कमी होतो, अडचणी वाढतात. लक्ष्मी माता यांची कृपा मिळवायची असल्यास घरातील तुटलेल्या मूर्तींना नमस्कार करून मंदिरात विसर्जित करा.

५) **तुटलेले किंवा गंजलेले लोखंडी सामान :** घरात तुटलेले किंवा गंजलेले लोखंडी सामान ठेवणे म्हणजे शनी आणि राहूच्या नकारात्मक प्रभावाला आमंत्रण. अशा वस्तूंमुळे आर्थिक नुकसान, आरोग्याच्या समस्या आणि तणाव वाढू शकतो. दिवाळीपूर्वी अशा वस्तूंची सफाई करून सकारात्मक ऊर्जा आणा.

# कलियुगात भगवंताचे स्मरणच का ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

नामस्मरण कशाकरिता करायचे, असा प्रश्न बऱ्याचदा निर्माण होतो. आपण मनुष्यदेह घेऊन जन्माला आलो आहोत. प्रत्येक जीवाच्या ठिकाणी परमेश्वराची शक्ती असून, ती सुप्तावस्थेत आहे. ती सुप्त असूनही मनुष्य बुद्धिमान असू शकतो. आपण जर भगवंताचे चिंतन केले, नामस्मरण केले, तर मनुष्याच्या अंतरंगात असलेली ईश्वरी शक्ती जागृत होते. त्यामुळे षड्रिपूंवर ताबा मिळविता येतो. सद्सद्विवेकबुद्धी निर्माण होते. वस्तूचे नाव किंवा नाम म्हणजे वस्तूची खूण असणारा नुसता शब्द नव्हे. नाम म्हणजे त्या वस्तूच्या अंतरंगात वावरणारी ईश्वराची शक्ती होय. नाम म्हणजे दृश्याला दृश्यपणाने धारण करणारी परमात्मशक्ती. नाम हे मूर्त व अमूर्त यांना जोडणारा दुवा होय.

**नामस्मरण म्हणजे काय ?**

आपण ज्याचे नाम घेतो तोच खरा आहे. त्याच्या सत्तेने सगळे घडते, ही जाणीव जागी राहणे, याला नामस्मरण म्हणतात. प्रपंचामध्ये वावरताना भगवंतांचे सारखे विस्मरण होते. विस्मरण होऊ नये, यासाठी नामासारखा अन्य उपाय नाही. श्री समर्थ नामस्मरणावर एवढा भर देतात. नामस्मरण ही नवविधाभक्तीतील तिसरी भक्ती. नाम अखंड जपत जावे. वेळ मिळेल तेव्हा नामस्मरण करावे. प्रातःकाळी, दुपारी, सायंकाळी नामस्मरणाचा सराव करावा, सवय करावी. सुख-दुःख, आनंद, स्वस्थता, अस्वस्थता, चिंता अशा मनाच्या कोणत्याही अवस्थेत नामस्मरणावाचून राहू नये. जीवनात स्थित्यंतरे येतच राहणार. सर्व दिवस सारखे राहात नाहीत. कधी यश तर कधी अपयश. सुस्थिती, दुःस्थिती अशा प्रतिकूल-अनुकूल परिस्थिती येतच राहणार. मात्र नामस्मरण स्थिर ठेवावे. मोठे वैभव प्राप्त झाले, सामर्थ्य वाट्यास आले, सत्ता मिळाली, फार मोठे ऐश्वर्य भोगण्याची संधी मिळाली, तरी नामस्मरण सोडू नये. नामस्मरणाने संकटे नाहीशी होतात, विघ्ने निवारण होतात. श्रद्धा ठेवून नामस्मरण केले, तर भूतपिशाचांची पीडा नाश पावते. अनेक दुःखे नामस्मरणाने नाहीशी होतात. नामस्मरणाने जीवाला अंतकाळी उत्तम गती मिळते. नामस्मरण करण्यासाठी वयाचे बंधन नाही. तरुणपणी, म्हातारपणी, संकटाचे प्रसंगी सदासर्वकाळ व अंतकाळीसुद्धा नामस्मरण करीत असावे. नामस्मरण केल्याने अनेक जण श्रेठत्वाला जाऊन पोहोचले आहेत. नामस्मरणाची मुळेच कुरवपूर मुक्ती देणारे क्षेत्र बनले आहे. विचार करा, की वाल्मिकीने रामराम म्हणण्याऐवजी मरामरा असे उफराटे नाम घेतले, तरीसुद्धा भगवंताने त्याचा उद्धार केला. इतके भगवंताचे नाम पवित्र आहे. उद्धार करणारे आहे. मोक्ष प्रदान करणारे आहे. इतकेच नव्हे, तर वाल्या कोळ्याचा वाल्मिकी बनविणारे आहेत. हा नाम महीमा आहे. अनेकप्रकारच्या दुःख-संकटातून भगवंताने प्रल्हादाला वाचवले. कारण तो अहोरात्र नाम घेत होता. आपल्या भक्तासाठी भगवंताने नृसिंह अवतार घेतला. अजाणतेपणी का होईना अंतकाळी अजामेळाने नारायण नाम घेतल्याने त्याचा उद्धार झाला. इतकेच नव्हे, तर नामाने पाषाणसुद्धा तरले. मोठमोठे महापापी केवळ नामस्मरणाने पवित्र होऊन गेले. परमेश्वराची नामे अनंत आहेत. नित्य नियमाने त्याचे स्मरण केल्यास माणूस तरून जातो. नामस्मरण करणाऱ्याला यमयातना होत नाहीत. कोणत्याही नामाच्या स्मरणाने माणूस भगवंतापर्यंत पोहोचू शकतो. भगवंताच्या हजारो नामांमधील एक नाम पसंत करावे. मनापासून त्याचा जप करावा. श्रद्धा असावी. आपले सार्थक झाल्यावाचून राहणार नाही. नामाचे स्मरण करीत राहिल्याने माणूस मोठा पुण्यात्मा बनतो. माणसाने इतर काहीच न करता फक्त ‘श्रीपाद श्रीवल्लभ’ या नामाचा जप करावा. तेवढ्याने भगवंत संतुष्ट होतो. आपल्या भक्तांना सांभाळतो. भगवंताचे अखंड अनुसंधान साधणे हे साऱ्या परामार्थाचे मर्म आहे. इतर साधनांचे कष्ट न करता जर मनुष्य नामात रंगला, तर जे साधायचे ते साधले म्हणून समजावे. महापापाचे मोठे डोंगरदेखील रामनामाच्या जपाने नष्ट होतात. नामाचा महिमा अपरंपार आहे. कोणत्याही म्हणजे चारही वर्णांच्या माणसांना नाम घेण्याचा अधिकार आहे. नामस्मरणाबाबत लहान-मोठा, स्त्री-पुरुष, तरुण-वृद्ध, अडाणी, मूर्ख असा भेदभाव नाही. नामाच्या आधाराने मूर्खातील मूर्खसुद्धा सुखाने संसारातून पार होऊ शकतो. त्यासाठी निरंतर नामस्मरण गरजेचे आहे, अशी मान्यता आहे.

# गणपती बाप्पांचा जीवन परिचय




**वडील** = भगवान शंकर  **आई** = देवी पार्वती
**मोठा भाऊ** = कार्तिकेय  **बहीण** = अशोकसुंदरी
**२ पत्नी** = रिद्धी व सिद्धी  **२ पुत्र** = शुभ व लाभ
**श्री गणेश यांचे जन्मठिकाण** = दोडीताल, उत्तरकाशी/कैलास पर्वत.
**श्री गणेश यांचा जन्म कशापासून झाला ?** = देवी पार्वतीच्या अंगावरील मळ आणि उटण्यापासून.
**वाहन उंदीर/मूषकाचे नाव** = डिंक
**शिव मानसपूजेत श्री गणेश यांचे नाव** = प्रणव
**श्री गणेश यांची पूजा/भक्ती करणाऱ्या संप्रदायाचे नाव** = गाणपत्य
**श्री गणेश यांना प्रथमपूज्य का म्हणतात ?** = कोणत्याही कार्यारंभी अग्रपूजेचा मान असल्याने.
**बालगणेशाचा शिरच्छेद कोणी केला ?** = भगवान शंकर
**चूक लक्षात येताच त्यांनी श्री गणेश यांना कसे पुनरुज्जीवित केले ?** = हत्तीचे शीर बसवून.
**श्री गणेश यांनी महर्षी व्यास रचित महाभारत महाकाव्याच्या निर्मितीत कोणती भूमिका पार पाडली ?** = लेखनिक
**श्री गणेश यांना प्रिय असणारे**
**खाद्यपदार्थ** = मोदक, लाडू
**आवडता रंग व फूल** = लाल, जास्वंदीचे
**प्रिय पत्री** = दूर्वा, शमीपत्र
**हातातील मुख्य अस्त्रे** = पाश, अंकुश
**नारद पुराणानुसार श्री गणेश यांची मुख्य १२ नावे** = सुमुख, एकदंत, कपिल, गजकर्णक, लंबोदर, विकट, विघ्ननाश, विनायक, धुम्रकेतू, गणाध्यक्ष, भालचंद्र व गजानन
**श्री गणेश यांची सुखकर्ता, दुःखहर्ता ही लोकप्रिय आरती कोणी लिहिली ?** = श्री समर्थ रामदास स्वामी

### आपण सगळे दरवर्षी श्री गणपती बसवतो. मात्र का बसवतो ?

याचे कारण कोणालाही माहीत नाही. आपल्या धर्मग्रंथानुसार भगवान वेद व्यास ऋषी यांनी महाभारत हे महाकाव्य रचले. परंतु त्यांना त्याचे लिखाण करणे शक्य होत नव्हते. त्यामुळे त्यांनी श्री गणेश यांची आराधना केली. श्री गणपती यांना महाभारत लिहिण्याची विनंती केली. त्यावेळी श्री गणपती यांनी होकार दिला. हे लिखाण दिवस-रात्र चालले. त्यामुळे श्री गणपती यांना थकवा आला. शरीरातील पाणीही वर्ज्य झाले. अशावेळी श्री गणपती यांच्या शरीराचे तापमान वाढू नये म्हणून व्यास यांनी श्री गणपती यांना मृत्तिकेचे म्हणजे मातीचे लेपन केले. भाद्रपद शुक्ल चतुर्थीला श्री गणपती यांची यथासांग पूजा केली. मातीचे लेपन केले म्हणून गणपती आखडून गेला म्हणून याला पार्थिव गणेश असे नाव पडले. हे लिखाण दहा दिवस चालले. अनंत चतुर्दशीला हे लिखाण संपल्यावर व्यास यांनी श्री गणपती यांच्याकडे पाहिले असता, त्यांच्या शरीराचे तापमान खूप वाढले होते. हे तापमान कमी व्हावे आणि श्री गणपती यांच्या अंगावरील माती निघावी म्हणून व्यासांनी श्री गणपती यांना पाण्यात विसर्जित केले. या दहा दिवसांत व्यासांनी श्री गणपती यांना खाण्यास वेगवेगळे पदार्थ दिले. तेव्हापासून श्री गणपती यांना बसविण्याची प्रथा पडली. ती प्रथा आजही कलियुगात अव्याहत आणि अखंडितपणे चालू आहे, अशी मान्यता आहे.

# साधनापथावरील सिद्ध योगी :

## स्वामी नित्यबोधानंदतीर्थजी महाराज



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

*अमळनेर ही भूमी शैक्षणिक आणि सामाजिक चळवळींसाठी प्रसिद्ध आहे. तशीच आध्यात्मिक परंपरेसाठीही प्रसिद्ध आहे. या भूमीत अनेक संत, महंत, साधक यांचा रहिवास झाला. त्यांनी अविरत आपले आध्यात्मिक लोक कल्याणाचे कार्य केले. परंपरा निर्माण केल्या. प्रवाहित केल्या. अशा महापुरुषांच्या मांदियाळीत दत्त संप्रदायाचे साधक प.पू. श्री १००८ स्वामी नित्यबोधानंदतीर्थजी महाराज हे एक अद्वितीय नाव आहे. २४ ऑक्टोबर २०२४ रोजी त्यांची जन्म शताब्दी त्यांच्या अनुयायांनी भक्तिभावाने साजरी केली. याप्रसंगी शासनाकडून स्वामीजींचे फोटोचे टपाल तिकीट प्रसिद्ध केले होते. अमळनेर मधील फक्त दोन व्यक्तींची आजवर टपाल तिकीट प्रसिद्ध झालीत. त्यात पू. साने गुरुजी आणि स्वामीजीं यांचा समावेश आहे. शुक्रवार, दि. २४ रोजी त्यांची १०१ जयंती. यानिमित्ताने सूश्री मीनाक्षीताई पाटील आणि स्वामीच्या परिवाराने पुणे येथे कोथरूडमध्ये गुळवणी महाराजांचे आश्रमात उत्सव साजरा केला. “ नित्य बोध भावांजली ” या स्मरणिकेचे दरवर्षीप्रमाणे प्रकाशन करण्यात आले. या पार्श्वभूमीवर त्यांच्या आध्यात्मिक कार्याचा थोडक्यात उजाळा...*

**प्रारंभीचा जीवनप्रवास**

स्वामीजींचे मूळ नाव श्री. गोपीचंद चिंधा देवकर असे होते. त्यांचा जन्म चिंधा आणि केसरबाई देवकर या धार्मिक दांपत्याच्या पोटी २५ ऑक्टोबर १९२४ रोजी एकादशीच्या पवित्र दिवशी झाला. त्यांचे जन्म गाव घुसर्डी (ता. पाचोरा) हे होते. त्यांच्या पत्नीचे नाव पुष्पाबाई असे होते. त्यांचे माहेर परधाडी (ता. नांदगाव, जि. नाशिक)

**शालेय शिक्षण, उच्च शिक्षण, सेवा**

स्वामींचे शालेय व महाविद्यालयीन शिक्षण चाळीसगाव येथे झाले. त्यांचे शिक्षण एम. ए. बीटी (संस्कृत स्पेशल) असे होते. पुढे अमळनेरमधील खानदेश शिक्षण मंडळाच्या प्रताप हायस्कूलमध्ये त्यांची शिक्षकपदी नियुक्ती झाली. ते अखंडित ३६ वर्ष शिक्षक सेवेत होते. त्यांनी प्रताप हायस्कूल, द्रौ.रा. कन्या शाळा, गंगाराम सखाराम हायस्कूल या शाळांमध्येही सेवा दिली. १९८२ मधे वयोमानानुसार उपमुख्याध्यापक पदावरून ते सेवानिवृत्त झाले. शिक्षक म्हणून त्यांची कारकीर्द अतिशय उत्तम होती. त्यांचे हस्ताक्षर अतिशय रेखीव सुंदर होते. त्यांचे शिक्षण संस्कृतमध्ये असल्याने शिकवतांना त्यांचे उच्चार अत्यंत स्पष्ट होते.

**अध्यात्माची बिकट वाट**

लहानपणापासून त्यांचा कल भक्तिमार्गाकडे होता. घरातल्या धार्मिक परंपरा, पूजा पाठ, कर्मकांड याचा संस्कार बालपणीच त्यांच्यावर झाला. पुढे त्यांना त्यात अधिकच रस निर्माण झाला. हा प्रवास तरुणपणात सुरूच राहिला. पुढे त्यांना शिक्षकाची नोकरी लागली. रोज सकाळी ६ वाजता ते शाळेत जाण्यासाठी तयार राहात होते. शाळेतून आल्यावर दुपारी पूजापाठ त्यानंतरच भोजन, एक तास विश्रांती, त्यानंतर विविध धार्मिक ग्रंथांचे वाचन, परिशीलन आणि चिंतन. सायंकाळी ध्यानधारणा, साधना हा त्यांचा नित्यनेम होता. सायंकाळी गावाजवळील डुबकी मारोती, वर्णेश्वर महादेव, खळेश्वर महादेव या मंदिरात दर्शनासाठी ते पायी जात होते. सायंकाळी राम मंदिर आणि तत्त्वज्ञान केंद्राचे ग्रंथालयात वाचन. तेथील प्रमुख श्री. ज. वा. जोशी यांच्या सोबत तात्विक चर्चा, अशी त्यांची दिनचर्या होती. काही काळ त्यांनी युग साधना या अंतर्गत गायत्री परिवाराचे प्रबोधनाचे काम केले. प्रा. ब. लू.सोनार उर्फ स्वामी पूर्णानंद यांच्या सोबत ते खेडोपाडी प्रचाराचे कार्य करीत.

**सद्गुरु भेट आणि शक्तिपात दीक्षा**

शाळेच्या कामानिमित्ताने त्यांना एसएससी बोर्डाचे पेपर तपासणीसाठी वेळोवेळी पुणे येथे जावे लागत होते. तिथे त्यांची भेट काही आध्यात्मिक मार्गातील व्यक्तिंसोबत झाली. त्यांच्याकडून त्यांना परमपूज्य गुळवणी महाराज यांच्याबद्दल कळाले. त्यांना भेटण्याची अनिवार इच्छा झाली. आपल्याला आध्यात्मिक मार्गातील गुरू म्हणून हेच मार्गदर्शन करतील असा त्यांना विश्वास वाटला. परमपूज्य गुळवणी महाराज “ कुंडलिनी जागृती ” या साधना पद्धतीतील एक अधिकारी व्यक्ति. त्यांनी या साधनेमधील “ शक्तिपात परंपरा ” प्रसार सर्वसामान्यांपर्यंत केला. कठोर परीक्षेनंतर त्यांची निवड शक्तिपात दिक्षेसाठी केली. परमपूज्य गुळवणी महाराजांनी त्यांना १९६२ मध्ये विधिवत पद्धतीने पुणे आश्रमात “शक्तिपात दीक्षा” दिली.

**संन्यास, दीक्षा आणि संन्याशाश्रम**

पुढे देवास येथील शक्तिपाताचार्य परमपूज्य शिवोमतीर्थ महाराज या सत्पुरुषांच्या सहवासाचा त्यांना लाभ झाला. १९८३ ते १९८८ याकाळात ते स्वामीजी यांच्या सहवासात राहिले. १९८९ मधे स्वामीजींच्या आदेशाने त्यांनी संन्यास घेतला. परमपूज्य शिवोम तीर्थ महाराज यांच्या हस्ते ऋषिकेश येथे दिनांक १३, १४, १५ जून १९८९ रोजी त्यांना विधिवत पद्धतीने संन्यास दीक्षा देण्यात आली. त्यावेळी त्यांचे योगपट नामकरण स्वामी नित्यबोधानंदतीर्थ असे अर्थपूर्ण नावाने करण्यात आले. पूर्वी ते गृहस्थाश्रमी असल्याने त्यांच्या आध्यात्मिक कार्याला मर्यादा होत्या. पुढे दीक्षित झाल्यानंतर त्यांनी संन्याशाश्रम स्वीकारला व ते कुटुंबापासून सर्वार्थाने अलिप्त झाले. मुंबईच्या नवाली येथील आश्रमाची जबाबदारी त्यांना सोपवण्यात आली. या आश्रमात त्यांनी १६ जून १९८९ ते डिसेंबर १९९९ पर्यंत त्यांनी कार्य केले.

**साहित्य निर्मिती**

स्वामी नित्यबोधानंद तीर्थ महाराज यांनी सुलभ, रसाळ भाषेत अनेक आध्यात्मिक पुस्तकांचे लिखाण केले. त्यात परंपरेच्या गुरू महाराजांच्या दैनंदिन आरत्या, नित्यबोध भावगंगा, नित्यबोध भजन गंगा, (यात श्री दत्तप्रभूंची भजने, सद्गुरूंवर आधारित भजने प्रत्येकी १०८ आहेत. याशिवाय त्यांनी आध्यात्मिक मार्गदर्शन करणारी काही पुस्तके लिहिली. त्यात “साधना कैवल्यप्राप्तीची”, “चांगदेव पासष्टी अर्थ व विवरणासहित”, “अपरोक्षनुभूती”, “कुंडलिनी सिद्ध महायोग “, “हरिपाठ अभंग विवरण सहित” या प्रमुख साहित्य कृतींचा समावेश आहे. काही पुस्तके महाराष्ट्र शासनाच्या साहित्य संस्कृती मंडळाने प्रकाशित केली आहेत.

**महानिर्वाण**

आयुष्यात शेवटी त्यांचे वास्तव्य मूळ गावी अमळनेरच्या शिवोम कुटी आश्रमात गेले. वास्तव्याला असतांना त्यांचे महानिर्वाण वयाच्या ९२ वर्षी दि. १६ एप्रिल २०१६ रोजी दुपारी तीन वाजून ४५ मिनिटांनी झाले. संन्याशी परंपरेप्रमाणे त्यांच्या पार्थिवाचे विसर्जन गुजरात राज्यातील “चानोंद” गावी नर्मदा नदीच्या पात्रात करण्यात आले. संन्यास धर्माप्रमाणे त्यांच्या सोळाव्याचा कार्यक्रम दि.१ मे २०१६ रोजी अमळनेर येथे शिवोम कुटी आश्रमात झाला. या कार्यक्रमाला विविध ठिकाणचे २९ सत्पुरुष, संन्याशी उपस्थित होते. बाहेर गावाहून आलेले शेकडो अनुयायी, साधक बंधू-भगिनी या कार्यक्रमाला उपस्थित होते.

**– भाऊसाहेब देशमुख,**
**मुक्त पत्रकार, अमळनेर.**

एस के ज्वेलर्स
गोल्ड । डायमंड । सिल्वर
शाखा २ प्रस्तुत
धनलक्ष्मी संचय योजना
नवरात्र व दिपावली महोत्सव निमित्त...
जिंका २४ कॅरेट सोने हमखास....

सदर योजनेमध्ये भाग घेणाऱ्या सर्व सभासदांना १००% अधिक सोने मिळण्याची हमी. या योजने मध्ये २५० सभासदांचा गृप असेल. सभासदांना एस के ज्वेलर्सच्या २४ कॅरेट करंट रेट प्रमाणे प्रती एक ग्रॅम गुंतवणूक करावी लागेल. तसेच प्रत्येक महिन्यांच्या १ ते १० तारखेपर्यंत पैसे शाखेवर जमा करावे लागतील. दर महिन्यांच्या शेवटच्या तारखेला एक भाग्यवान सभासद सोडत पध्दतीने निवडला जाईल. त्यास योजनेप्रमाणे २४ कॅरेट सोने दिले जाईल आणि पुढील हप्ते भरण्याची आवश्यकता नाही. उर्वरीत २३० सभासदांना २० + १ = २१ ग्रॅम २४ कॅरेट सोने २१ व्या महिन्याच्या शेवटच्या तारखेला देण्यात येईल.

| पहिला ड्रॉ | दुसरा ड्रॉ | तिसरा ड्रॉ | चौथा ड्रॉ | पाचवा ड्रॉ |
|---|---|---|---|---|
| गुतवणूक १ ग्रॅम लाभ १९ ग्रॅम एकूण २० ग्रॅम | गुतवणूक २ ग्रॅम लाभ १८ ग्रॅम एकूण २० ग्रॅम | गुतवणूक ३ ग्रॅम लाभ १७ ग्रॅम एकूण २० ग्रॅम | गुतवणूक ४ ग्रॅम लाभ १६ ग्रॅम एकूण २० ग्रॅम | गुतवणूक ५ ग्रॅम लाभ १५ ग्रॅम एकूण २० ग्रॅम |
| **सहावा ड्रॉ** | **सातवा ड्रॉ** | **आठवा ड्रॉ** | **नववा ड्रॉ** | **दहावा ड्रॉ** |
| गुतवणूक ६ ग्रॅम लाभ १४ ग्रॅम एकूण २० ग्रॅम | गुतवणूक ७ ग्रॅम लाभ १३ ग्रॅम एकूण २० ग्रॅम | गुतवणूक ८ ग्रॅम लाभ १२ ग्रॅम एकूण २० ग्रॅम | गुतवणूक ९ ग्रॅम लाभ ११ ग्रॅम एकूण २० ग्रॅम | गुतवणूक १० ग्रॅम लाभ १० ग्रॅम एकूण २० ग्रॅम |
| **अकरावा ड्रॉ** | **बारावा ड्रॉ** | **तेरावा ड्रॉ** | **चौदावा ड्रॉ** | **पंधरावा ड्रॉ** |
| गुतवणूक ११ ग्रॅम लाभ ०९ ग्रॅम एकूण २० ग्रॅम | गुतवणूक १२ ग्रॅम लाभ ०८ ग्रॅम एकूण २० ग्रॅम | गुतवणूक १३ ग्रॅम लाभ ०७ ग्रॅम एकूण २० ग्रॅम | गुतवणूक १४ ग्रॅम लाभ ०६ ग्रॅम एकूण २० ग्रॅम | गुतवणूक १५ ग्रॅम लाभ ०५ ग्रॅम एकूण २० ग्रॅम |
| **सोळावा ड्रॉ** | **सतरावा ड्रॉ** | **अठरावा ड्रॉ** | **एकोणीसावा ड्रॉ** | **विसावा ड्रॉ** |
| गुतवणूक १६ ग्रॅम लाभ ०४ ग्रॅम एकूण २० ग्रॅम | गुतवणूक १७ ग्रॅम लाभ ०३ ग्रॅम एकूण २० ग्रॅम | गुतवणूक १८ ग्रॅम लाभ ०२ ग्रॅम एकूण २० ग्रॅम | गुतवणूक १९ ग्रॅम लाभ ०२ ग्रॅम एकूण २१ ग्रॅम | गुतवणूक २० ग्रॅम लाभ ०२ ग्रॅम एकूण २२ ग्रॅम |

एस के ज्वेलर्स
गोल्ड । डायमंड । सिल्वर
शाखा नं. २
नगर परिषद शेजारी, स्टेशन रोड, अमळनेर
मोबा. 7092929254